# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०९/२०२४ (शुक्रवार) दुपार**

---

**कळमेश्वर हद्दीत अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमांवर**
**पोस्टे कळमेश्वर आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची संयुक्तिक कारवाई**

दि. १३/०९/२०२४ रोजी पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील मौजा गौंडखैरी, पारधी बेडा येथे मोठया प्रमाणावर अवैध गावठी दारू तयार करून आजूबाजूचे परीसरात विक्री करणार असल्याची गोपनीय खबर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक आणि कळमेश्वर पोलीस यांना मिळाल्याने पोस्टे कळमेश्वर हद्दीतील मौजा गौंडखैरी, पारधी बेडा येथे सुरू असलेल्या अवैधरीत्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या एकूण १२ इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या गावठी पद्धतीने हातभट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे १० महिला आरोपी व ०२ पुरूष **१) प्रदीप उर्फ गजानन प्रतापराव भोसले, वय ३० वर्ष, रा. गौंडखैरी पारधी बेडा २) राजेंद्र गुलाबराव गुजर वय ५६ वर्ष, रा. गौंडखैरी पारधी बेडा** यांचे ताब्यातून एकुण १) प्लॅस्टिक डबकित एकूण ३२० लिटर मोहाफुल गावठी दारू ५०/—रू. लीटर प्रमाणे एकूण किंमती १६०००/—रू. २) ८८०० लिटर मोहफुल सडवा रसायन एकूण किंमती १,७६,०००/—रू. व इतर दारू गाळण्याचे साहित्य किंमती ३६४००/—रू., गुळ ५०० किलो किंमती ३०,०००/— रु. असा एकुण २,५८,४००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले. १२ आरोपीतांविरूद्ध कलम ६५(ई), (एफ) (बी) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १२ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोस्टे कळमेश्वर ठाणेदार मनोज काळबांडे, सपोनी किशोर शेरकी, मनोज गदादे, आशिष ठाकूर, पोउपनि बटूलाल पांडे, पोउपनि मनोज टिपले, सफौ महेश जाधव, सफौ मिलिंद नांदुरकर, सफौ विनोद काळे , पोहवा संजय बांते, ईकबाल शेख, निलेश बर्वे, रोशन काळे, रोहन डाखोरे, राजेंद्र रेवतकर, प्रमोद भोयर, पोना वीरेंद्र नरड, पोअं धोंडुतात्या देवकत्ते, अभिषेक देशमुख, मपोहवा नितु रामटेके, मपोहवा कविता बचले, चापोहवा अमोल कुथे, चापोशी आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर